MHKO110001752022

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक २३/२०२२</u>**
**<u>निशाणी क्रमांक ५ वरील आदेश</u>**

**<u>बंडुलाल महमद सनदे वगैरे</u>**

**<u>वि.</u>**
**<u>नंदा उर्फ नंदिनी विजयसिंह यादव वगैरे</u>**

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ३९ नियम १ व २ अन्वये प्रतिवादी चे विरुध्द तुर्तातुर्त मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे.

***<u>वादी यांचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे–</u>***

**०२.** सदर नमूद दाव्यामध्ये मौजे शिरोली पुलाची, ता. हातकणंगले जि.कोल्हापूर येथील मिळकत गट नं. १४९, गट नं. १४५, गट नं. १४७ तसेच गट नं. १४९ मधील पाण्याची विहीर, शेत घर व १४९ मधील पाण्याच्या विहीरीवर पाईप लाईन सदर मिळकतीस *(यापुढे 'दावा मिळकत'असे संबोधण्यात येत आहे.)* या भुजंगराव पर्वतराव यादव यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीतील होत्या.

**०३.** वादींचे कथन असे की, भुजंगराव हे दि. १०.०६.१९७० रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या पश्चात ७/१२ पत्रकी वारसा हक्काने त्यांची मुले शामराव व विजयसिंह यांची नावे नोंद आहेत. विजयसिंह हे दि. ०५/०४/२००४ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी नं. १ व २ हे मयत विजयसिह यांचे वारस म्हणून त्यांची नावे ७/१२ पत्रकी नोंद झालेली आहेत.

**०४.** वादींचे पुढे कथन असे की, प्रतिवादी नं. १ व २ यांचे पूर्वहक्कदार भुजंगराव पर्वतराव यादव यांच्यास मौजे शिरोली, कसबा बावडा, मौजे तिटवे येथे दावा मिळकती तसेच मंगळवार पेठेत आर. सी. सी. इमारत आहे. भुजंगराव पर्वतराव यादव यांनी वादीचे पूर्व हक्कदार बाबालाल यांचे हक्कात दावा मिळकतीबाबत व इतर मिळकतीबाबत स्टॅम्पवर कबुलायत लिहून दिली आहे. दावा मिळकतीबाबत जमीन

मालक व वादीचे पूर्व हक्कदार यांचेमध्ये टेनन्सी कोर्टात चाललेल्या कामाच्या निकालानंतरही दावा जमीन वादीचे पूर्व हक्कदार यांचेकडे कुळ या नात्याने जमीन मालकांनी ठेवली आहे व त्यावेळीपासून दावा जमीन वादीकडे कुळ हक्काने कब्जे वहिवाटीत आहे.

**०५.** दावा मिळकतीसह शिरोली येथील शेत मिळकती भुजंगराव पर्वतराव यादव यांनी वादी यांचे पूर्वहक्कदार बाबालाल सनदे यांना ऊसाच्या पिकासाठी खंडाने कुळ म्हणून लागणीस दिल्या. त्याप्रमाणे दावा गट नं.च्या ७/१२ पत्रकी कुळ खंड कोष्टकी वादीचे पूर्व हक्कदार बाबालाल सनदे यांचे नांव प्रत्यक्ष कुळ म्हणून नमूद झाले. अशाप्रकारे दावामिळकती वादीचे पूर्व हक्कदार बाबालाल लाला सनदे यांचेपासून आजअखेर ऊसाच्या लागवडीकरिता वादीकडे प्रत्यक्ष लागवडीस व कसवणुकीस आहेत. वादी हे दावा मिळकतीमध्ये सालोसाल कष्ट काम करुन ऊस, भात, गवत, सोसाबीन, गहू इ. पिके घेत आहेत. दावा गट नंबर मध्ये पूर्वी गु–हाळ घाणा होता व सदर घाण्यावर दावा मिळकतीमधील ऊसाचे गाळप केले जात असे. कोल्हापूर जिल्हयात साखर कारखाने झालेनंतर दावा मिळकती मधील ऊस वादी हे राजाराम सहकारी साखर कारखाना कसबा बावडा कोल्हापूर व कागल सहकारी साखर कारखाना व वारणा सहकारी साखर कारखाना या कारखान्याकडे वादी हे पाठवत आले आहेत.

**०६.** ठरलेप्रमाणे वादीचे पूर्व हक्कदार व त्यानंतर वादी हे दावा मिळकतीचा खंड पूर्वी गुळ व धान्याच्या स्वरुपात देत होते. त्याबाबत जमीन मालक भुजंगराव हे वादीचे पूर्व हक्कदारांना खंड पोहचलेबाबत पावत्या देत होते. तसे त्यांचेमध्ये पूर्वी दावा मिळकतीच्या कबुलायती झाल्या आहेत. तसेच प्रतिवादी नं. १ हिने दावा मिळकती तिच्या पतीच्या पश्चात ही वादीकडे पूर्वीप्रमाणेच कुळ नात्याने खंडाने कसवणुकीस असून ठरलेप्रमाणे वादी प्रतिवादी नं. १ व २ यांना खंड देत आले आहेत. याबाबतचे लेख ही प्रतिवादी नं. १ हिने स्टॅम्पवर सन २००६ साली लिहून दिला आहे. त्याप्रमाणे

वादी हे शेती खर्च, लागवड, भांगलण, नांगरट, कुळपण व पाणी इ. चा खर्च वजा करून ऊस बिलाच्या १/२ रक्कम खंड म्हणून प्रतिवादी नं. १ व २ ला देत आले आहेत.

**०७.** वादी हे पूर्वीपासून कष्टमशागतीचे व ऊस बिलाच्या खर्चाचे कच्चे टिप्पण वहीमध्ये लिहून ठेवत असत. तसे टिप्पण आजअखेर वादीने लिहून ठेवले आहे. तसे वहीच्या टिप्पणागील हिशोब झालेवर पूर्वी प्रतिवादी नं. १ व २ करिता शामराव यादव यांनी सदर टिपण वहीमध्ये काही वेळा सही करीत आले आहेत व काही वेळा प्रतिवादी नं. १ चे भाऊ बाळासाहेब नाईक निंबाळकर यांनी सदर टिपण वहीमध्ये सहया केल्या आहेत. सदरचे हिशोबाचे टिप्पण वादीने आपल्या हस्ताक्षरात वेळोवेळी लिहीले आहे. अशाप्रकारे आजअखेर वादीची दावा मिळकतीमध्ये कुळ हक्काने कब्जे वहिवाट सुरु आहे.

**०८.** प्रतिवादीचे पूर्व हक्कदार विजयसिंह व त्यांचे पश्चात प्रतिवादी नं. १ व २ चे सलोख्याचे व विश्वाचे संबंध असलेने दावा मिळकतीचा खंड स्वरुपात ज्या–ज्या वेळी वादीने रक्कमा दिल्या, त्यावेळी त्यांचेकडून पावत्या घेतल्या नाही व तशा पावत्या घेण्याचा प्रसंग ही आला नाही. कारण प्रतिवादी नं. १ व २ हे सरकार घराण्यातील असलेने व पूर्वीपासून त्यांचे व वादीचे संबंध चांगले असलेने सर्व व्यवहार पूर्वीपासून विश्वासाने होत आले आहेत.

**०९.** प्रतिवादी नं. १ चे पती मयत झालेनंतर प्रतिवादी नं. १ चा दिर शामराव व प्रतिवादी नं. १ व २ यांचे मध्ये वितुष्ट आलेचे प्रतिवादी नं. १ व २ कडून वादींना सांगणेत आले आहे व सर्व दावा मिळकत प्रतिवादी नं.१ चा दिर शामराव गिळंकृत करण्याच्या तयारीत आहे असे प्रतिवादी नं. १ हे वादी यांना वारंवार सांगत आली आहे. दावा गटनंबरमधील शामरावचा हिस्सा हा शामराव स्वतः करीत नसून मयत बाबालालचे इतर वारस प्रतिवादी नं. ३ ते ५ हे कुळ हक्काने करीत आहेत. शामराव हा अत्यंत चाणाक्ष्य व चतुर असा होता व त्या दृष्टीनेच तो प्रतिवादी नं. ३ ते ५ बरोबर दावा मिळकतीसंबंधी व्यवहार करीत आला आहे. शामराव सध्या मयत झाला आहे.

**१०.** वादीची दावा मिळकतीमध्ये वादीची कुळ हक्काने शांततामय कब्जे वहिवाट आजअखेर सुरु आहे. प्रतिवादी नं. १ व २ हे दावा मिळकतीमधील वादीचे कायदेशीर हक्कास बाधा आणण्याच्या हेतूने शिरोली येथील बडया लोकांच्या मदतीने दावा मिळकतीमधील वादींच्या शांततामय कब्जे वहिवाटीस बेकायदेशीरपणे अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत याची खात्री वादींना झालेली आहे व आम्ही दावा मिळकत विक्री करणार आहे असे वादीस प्रतिवादी नं. १ व २ यांनी बोलून दाखवले आहे. अशा सर्व परिस्थितीत प्रतिवादी नं. १ व २ यांनी बोललेप्रमाणे कृती केलेस दावा मिळकतीमधील वादीच्या कायदेशीर हक्कास बाधा निर्माण होणार आहे व वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, वादीने सदरचा दावा व मनाई अर्ज दाखल केला आहे.

**११.** प्रतिवादी नं. १ व २ यांनी नि. १६ वर कैफियत व लेखी म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, वादी यांचा दावा व तूर्तातूर्त मनाई अर्ज खोटा, चुकीचा व लबाडीचा आहे. दावा मिळकतीबाबत वादी यांनी अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. प्रतिवादी नं. ३ ते ५ यांना पक्षकार करण्याचे कोणतेही कारण नाही. दावा मिळकतीचे वर्णन व चतु:सिमा या खोटया व चुकीच्या आहेत. दाव्यास ऑ. ७ रू. ३ ऑफ सी.पी.सी. ची बाधा येत आहे. वादीचे पूर्वहक्कदार बाबालाल सनदे यांचे नाव प्रत्यक्ष कुळ म्हणून नमूद आहे हे वादींचे कथन कोणत्याही कागदोपत्री पुराव्याशिवाय आहे. वादी यांनी प्रतिवादी नं. ३ ते ५ यांच्याबरोबर संगनमत करून खौअया दाव्याची रचना केलेली आहे.

**१२**. दावा मिळकत भुजंगराव पर्वतराव यादव यांच्या मालकीची होती. भुजंगराव हे दि. १०/०७/१९९७ रोजी मयत झाले यांच्या मिळकती वारसा हक्काने विजयसिंह शामराव यांना प्रत्येकी आठ आणे हिस्सयाने मिळाल्या. याप्रमाणे यांची नांवे सात बाराला लावली प्रतिवादीचे पुर्व हक्कदार भुजंगराव यांनी वादीचे पुर्वहक्कदाराबाबत बंडुलाल सनदे यांना कुळ म्हणून दावा मिळकतीत ठेवले होत. वादी हे बाबालाल यांचे

नातू आहेत. वादीच्या मध्ये टेन्नसी न्यायालयात निकाल झाल्यानंतर दावा मिळकत पुर्वीप्रमाणे वादीचे पुर्व हक्कदार यांच्याकडे कुळ या नात्याने जमिन मालकाने ठेवली आहे. व त्यावेळीपासून दावा मिळकत ही वादीकडे पुर्वहक्काने वहीवटीस आहे. कलम ७ मध्ये नमुद केले आहे की, वादी हे दावा मिळकतीचे खंड पुर्वी देत होते. प्रतिवादी क्र. १ यांनी तीच्या पतीच्या पश्चात ही वादीकडे पुर्वी प्रमाणेच कुळ नात्याने खंडाने करूवणुकीस असून ठरलेप्रामणे वादी प्रतीवादी १ व २ यांना खंड देत आले आहेत. खर्च वजा जाता ऊस बिलाचा १/२ रकक्म खंड म्हणून प्रतिवादी १ व २ यांना देत आले आहेत.

**१३.** हिशोब झालेवर पुर्वी प्रतिवादी १ व २ करीता शामराव यादव यानी सदर टिप्पण वहीमध्ये काही वेळा सहया करीत आले आहेत. व काही वेळा प्रतिवादी नं. १ चे भाऊ बाळासाहेब नाईक निंबाळकर यांनी सदर टिपण वही मध्ये सहया केल्या आहेत.

**१४.** शामराव हा अतयंत चाणक्ष व चतुर असा होता.

**१५.** चालू साली वादीने दावा मिळकतीमध्ये उस भात इत्यादी पिके केली असून दावा मिळकती मधील ऊस राजाराम सह. साखर कारखाना येथे पुरविला आहे व ठरल्या प्रमाणे वादीने ऊस बिलाच्या रक्कमेपैकी प्रतिवादी नं. १व २ यांना खंडाची रक्कम रोख स्वरूपात दिलेली आहे.

**१६.** प्रतिवादी नं. १ व २ विरूध्द सदरचा मनाईचा दावा दाखल करून मनाईची दाद प्रतिवादी विरूध्द मागणी करीत आहे.

**१७.** प्रतिवादी नं. ३ ते ५ ने दावा गट नं. मध्ये १/२ हिस्स्यामध्ये कुळ हक्कने कब्जे वहिवाट असलेने त्यांना या कामी पक्षकार केले आहे.

पुरावे

अ) भुमापन क्र. १४५ चा सन २०१७–२०१८ चा ७/१२

क्षेत्र १–१४–५० पैकी शामराव भुजंगराव यादव ०–२४–२५

नंदा विजय यादव ०–२४–२५

प्रियांका विजय यादव

ब)  सन १४५ चा १९६६–६७ चे १९७५–७६ चा ७/१२
यामध्ये कब्जेदार सदरी भुजंगराव यादव यांचे नांव कमी झालेले आहे. व
१) विजय भुजंगराव यादरव २) शामराव भुजंगराव यादव अशी नोंद आहे.

क)  भुमापण क्र. १४७ चा सन २०१८–१९ चा ७/१२
(भोगवटदार वर्ग २ ची जमीन सक्षम प्राधिका–याच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरास बंदी रिलिंग कायदा अंतर्गत वाटप जमीन क्षेत्र ०.९६

भोगवटदार शामराव भुजंगराव यादव  ०–४८–०
नंदा विजय जाधव
प्रियांका विजय जाधव  ०–४८–०
या ७/१२ वर कुळ म्हणून कोणाचेही नाव नाही.

ड)  भुमापन क्र. १४९ क्षेत्र १–९४–०
+ ०–५–०   भोवटदार वर्ग २

शामराव भुजंगराव यादव ०.९७
नंदार विजय यादव
प्रियांका विजय यादव  ०.९७

सक्षम प्राधिका–याच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरास बंदी सिलिंग कायद्याअंतर्गत वाटप जमीन या ७/१२ वर कुळ म्हणून कोणाचेही नाव नाही.

इ)  सन १४७ क्षेत्र २ एकर १५ गुंठे सन १९५६–५७ ते १९६६–६६ या ७/१२ मध्ये कब्जेदार सरकार भुजंगराव पर्वतराव यादव इतर हक्कासाठी सा. कु. बाबालाल लाला सनदे मोहद्दीन इमाम देसाई माणिक हुसेन देसाई बाळासो धोंडीराव देसाई युसुब अस्लम गोलंदाज या कुळांची नांवे कमी केलेली आहेत. (५४९१)
१९६१–६२ ते १९६५–६६ पर्यंत पिकपहानिस खुद्द अशी नोंद आहे.

**प्रतिवादी १ व २ तर्फे सादर पुरावे –**

१) फेरफार नं. ५४९१ ता १७/०३/६१ इ.

१८. दावा मिळकतीध्ये प्रस्तुत वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान कोणताही करार झालेला नाही. वादी दावा मिळकतीमध्ये कुळ असलेबाबतचा कोणताही पुरावा वादी यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. आपल्या मिळकती मधील उस पिक वादी यांनी चुकीचा नंबर नमूद करून उस पावत्या हजर केलेल्या आहेत. वादीच्या दाव्यास नॉन कॉज ऑफ ॲक्शन ची बाधा येत आहे. वादी हे . मे. कोर्टासमोर स्वच्छ होताने आलेले नाहीत. सबब, सदरचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

१९. वादी यांची तुर्तातुर्त मनाई अर्जातील कथने व त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे पाहून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले. वादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा युक्तीवाद व प्रतिवादी तर्फे सन्माननिय विधीज्ञ यांच्या युक्तीवादावरून मी खालील मुद्यांचे त्याखाली दिलेल्या कारणांसहित निष्कर्ष नोंदवले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस वादी यांचे बाजूने आहे असे वादी शाबित करतात काय ? | **नाही.** |
| २. | न्यायाचा समतोल वादी यांचे बाजूने आहे असे वादी शाबित करतात काय ? | **नाही.** |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे काय ? | **नाही.** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

२०. सदर कामी रोजनाम्यानुसार प्रतिवादी यांनी नि.४० वर सदरचा आदेश त्वरीत होणेकरीता अर्ज दिला होता. तथापि वादी यांचा अधीकचा युक्तीवाद ऐकणे आवश्यक होते. सदर कामी यापूर्वी पूर्वपिठासीन अधिकारी यांनी आदेश का पारीत केला नाही ? याबाबत कोणतेही विधान या न्यायालयास सद्यस्थितीत करता येणे शक्य नाही. या न्यायालयाकडे सदरचे काम प्राप्त झालेनंतर सदर कामी योग्य वेळी सुनावणी घेणेत आलेली आहे आणि जलदगतीने काम होणेसाठी नजीकच्या तारखा वादी व प्रतिवादी यांच्या समंतीने देण्यात आलेल्या आहेत. सदर कामी विधिज्ञ यांनी युक्तीवाद

करण्यासाठी तीन दिवसांचा कालावधी पूर्णवेळ देण्यात आलेला होता. या न्यायालयाकडे सटेनो यांची नियुक्ती नव्हती. त्यामुळे न्यायालयास स्टेनोचे काम करावे लागत असल्याने या कामी संपूर्ण कागदांचे अवलोकन केल्यानंतर व वादी यांचा अधीकचा युक्तीवाद ऐकल्यानंतर आदेश करणे क्रमप्राप्त असल्याने आज रोजी आदेश पारीत करण्यात येते आहे.

## –:: का र ण मि मां सा ::–

**मुद्दा क्र. १ करीता:–**

**२१.** दावा प्रलंबीत असताना तुर्तातुर्त ताकीदीची मागणी मंजूर करणे ही न्यायालयाच्या विवेकाधिन अनुतोषाशी निगडीत असणारी बाब आहे. असा न्यायालयीन विवेकाधिकार वापरताना मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***Dalpat Kumar and another Vs. Pralhad Singh and others (1992) 1 SCC 719*** या न्यायनिर्णयामध्ये खालील घटक पडताळून पाहणे आवश्यक आहेत असे मार्गदर्शन केले आहे.

(अ) **वादीला सकृत दर्शनी बाजू आहे काय ?**
(ब) **न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय ?**
(क) **अर्ज नाकारल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ?**

**२२.** वादीतर्फे विधीज्ञ ॲड. एम. एन. बिंदगे यांनी युक्तीवाद केला की, प्रतिवादी नं. १ नंदीनी पत्नी आहेत. विजयसिंह शामराव यांच्या वडीलार्जित मिळकती आहेत. यांच्या दरम्यान दावा मिळकती आणि अन्य मिळकती संदर्भात वाटप झाले नाही. विजयसिंहच्या हयातीमध्ये प्रतिवादी क्र.१ व विजयसिंह यांच्या कुटुंबियांना शामराव कडून उत्पन्न मिळत नव्हते. म्हणून, प्रतिवादी १ व २ यांनी २००६ साली स्पेशल सीव्हील सूट नं. ८९/२००६ सदयाचा नं. १२१/२०१२ हा वाटपासाठी दाखल केला आहे. नि. १७ सोबत एकूण २४ कागदपत्रे दाखल केले आहेत. दावा वाटपाचा व स्वतंत्र कब्जाबाबत मालकी हक्काने दाखल केला आहे. प्रतिवादी १ विधवा आहेत. विजयसिंह मयत झाल्यानंतर दावा दाखल केला आहे. दावा मिळकतीच्या

वाटण्या झाल्या. प्रतिवादी १ व २ यांचे हिश्याची मिळकत त्यांना देण्यात आली. माझ्या हिश्याची वाटणीने मला मिळकत आली नाही तर मी ती मिळकत भाडेकरा तत्वावर दिली असे होत नाही.

**२३.** परिच्छेद क्र. ७ दावा कलम ब मध्ये नमूद केले आहे की, प्रतिवादी १ चे वडील खंड देत होते आणि आज अखेर खंड देत आले आहेत. खंडाने लागण केली याबाबतचा पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. प्रतिवादी क्र. १ व २ करिता शामराव टिपण वही मध्ये सही करत होते. शामराव यांचा मृत्यू झाल्यानंतर दावा दाखल केला आहे. शामराव मयत झाल्यानंतर कब्जा भूजंगराव यांच्याकडे आला आहे. भाडेकरार नव्याने कधी अंमलात आणला त्याचा कागदोपत्री पुरावा दाखल नाही. परिच्छेद क्र. ४ मध्ये नमूद केले आहे की, भाडेकरार तत्वाप्रमाणे काम केले होते. कुळकायदा कलम ७०(ब) नुसार कुळ कायदा अस्तित्वात असल्याबाबत मागणी करावी लागली. परिच्छेद १० मध्ये दावा गट नंबर मधील शामराव चा हिस्सा प्रतिवादी क्र. ३ ते ५ कूळ हक्काने करित आहेत. शामराव मयत झालेनंतर बाबालाल यांचे वारस प्रतिवादी क्र. ३ ते ५ असल्याचा दावा वादी का करत आहेत याचा पुरावा अभिलेखावर दाखल करणे आवश्यक आहे.

**२४.** नि.५ मध्ये विनंती केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कब्जेवहिवाट करून दावा मिळकत तबदील करून या बाबी शाबित करण्यासाठी वाद मिळकती माझ्या संबंधीत आणि माझ्या वारसांच्या संबंधीत आहेत. या बाबतचे कागदपत्र दाखल केले आहे. नि. १६ वर कैफीयत मध्ये नमूद केले आहे की, दावा मिळकतीचे वाटप कधीही झाले नाही. नंदीनीचा पुरावा अदयाप अपुरा आहे. वाटपाचा दावा २००६ पासुन प्रलंबित आहे. नंदीनी चे पती दि. ०५/०४/२००४ रोजी मयत झाले. भुजंगराव हे १९७० रोजी मयत झाले. शामराव २०२१ रोजी मयत झाले. विजयसिंह यांची मुलगी नंदा यादव विवाहा नंतर नागपूर येथे स्थायिक आहे. तिचा १/३ हिस्सा आहे. नि २४ वर गट नं. १४९ च्या ७/१२ वर खुद्द अशी नोंद आहे. फेरफार क्र. ५४९१ १९६२

पासून नमूद केला आहे. दि. १३/०३/१९६१ रोजी पंच विदयमाने देउन भुजंगराव यांच्याकडे मिळकत दिली अशी नोंद आहे. त्यांनतर, कूळ म्हणून लागण कधी झाली नोंद कधी झाली हे वादीने कागदपत्रा नुसार दाखल केले आहे. नि. २४ अ.क्र. ८,९,१० इतर हक्कामध्ये कूळ नोंदणी नाही. घरपड पेट्रोल पंप रस्तापड असे नोंद आहे. सन १९६२ पूासन फेरफार ५४९१ नुसार असे नमूद केले आहे की, १३/०३/१९६१ रोजी आणि ०६/०३/१९६१ रोजी पंचविदयमाने देउन मार्च ६१ मध्ये भुजंगदाव यांच्याकडे दिली. त्यानंतर कुळ म्हणून लागू कधी झाली. कुळाची नोंद झाली हे वादीने कागदोपत्री दाखल केले पाहिजे. दावा मिळकती दाावा दाखल झाल्यापासून कोणाचा कायदेशीर ताबा आहे. Possession should be lawful. Title status rights interest along with pleading should be proved. They should be pray in writing or in the form of documentary evidence. वादी नं. २ चे वय ५४ वर्षे आहे. २०२२ च्या पाठीमागे ५० वर्षे गेले तर वादी नं. २ चा जन्म १९७२ चा आहे. वादी नं. १ चा जन्म १९५१ साली त्याचे वय १९६१ साली १० वर्षे होते. कुळ कायद्याने बंडुलाल यांना कब्जा कसा मिळाला याबाबत पुरावा नाही. कुळ कायदयाने कार्यवाही झाली व अंतिम कुळ कायद्याने ताबा मिळाला. पण तरीही ताबा कुळ कायद्याने वादीकडे ठेवण्यात आला हे मान्य केले आहे. पणे, वादी क्र. २ चा जन्म झाला नव्हता आणि वादी क्र. १ हे १० वर्षाचे होते.

**२५.** नि.११ ते १४ बाबालाल सनदे कुळ म्हणून नोंद झाले आहेत. नि १५ १६ प्रतिवादी शामराव ने दावा दाखल केला. रे. क. नं. १०१०/२००४ मिळकती प्रतिवादी नं १ व शामराव हे कसत होते. आणि प्रतिवादी यांनी पिकाचे उत्पन्न घेउ नये असा आदेश पारित केला होता. म्हणून प्रतिवादीने ९/२४ दावा दाखल केला. १७/०३/१९६१ महसूल विभागातील नोंदी प्रमाणे वादीला दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क नाही. नि. २९,३० फेरफार १४३, १४५, १४७ ,१४९ इत्यादी १७/०३/१९६१ नुसार आहेत. This order did not challenged before

collector of Kolhapur or Deputy collector or any other executive officer of revenue department. पंच विदयमाने याचा अर्थ ज्या प्रमाणे पंचनामा करून बेलीफ अहवाल दाखल करतात त्याप्रमाणे ६३ वर्षापूर्वी पंचनामा झाला आहे. **Evidence Act section 34 36 Maharashtra Revenue Section 157**

**२६.** त्यामुळे वादीकडे दावा मिळकतीचा कब्जा कसा आला हे शाबित करणे आवश्यक आहे. नि. २९(२), ३२(ग) व ७७, नि. २९(३), ३२(ग) ची चौकशी रद्द केल्याचे आदेश पारित केला. दि. २९/०१/१९७५ रोजी दोन्ही पक्षकार गैरहजर त्यामुळे, सदरची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे असा आदेश केला. नि. २९, ४१ वर जाबदार बाबालाल सनदे यांचेकडून रितसर १० दिवसांची नोटीस देउन तजवीज करण्याची असे नमूद केले. १७/०३/१९६१ ला कब्जेपट्टी झाली. कलम ६ नुसार स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट त्याप्रमाणे कुळ कायदयामध्ये नमूद केले आहे की, दावा मिळकती मध्ये हरकत केल्यास दावा दाखल करता येतो. याकरिता प्रतिवादीने उच्च न्यायालय यांच्या न्यायनिर्णयांचा उल्लेख केला. कलम २ नुसार टेनंट म्हणजे How the tenancy comes to exist Balkrushna Galande Vs. State Of Maharashtra. २०२२ साली कुळ हक्काने वादीची वहिवाट होती यासंदर्भात पुरावा दाखल नाही. शामलाल चिंतामणी वि. काकासाहेब गोते भुजंगराव विजयसिंह शामराव यांच्यापैकी कोणही वादीला कुळ म्हणून ठेवले याचा उल्लेख नाही. कलम ४ चा विचार केल्यास १९५७ ते ६१ पर्यंत दावे दाखल केलेत. कुळ कायदा संपल्यानंतर पुन्हा वादीला कुळ हक्क देता येणार नाही. the suit itself is not maintainable. Therefore, interim application is not maintainable. कलम ४१ स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट. Therefore, injunction application be rejected.

**२७.** सदरचा दावा मनाईकरिता असून दावा मिळकत ही शेत मिळकत आहे. गट नं. १४९ मध्ये विहीर आहे. पूर्वहक्कदार भुजंगराव यादव आहेत याबद्दल कोणताही वाद नाही. भुजंगराव यांना शामराव व विजयसिंह हे वारस आहेत. विजयसिंह यांना

नंदा, प्रियांका हे वारस आहेत. ७/१२ मध्ये त्यांची नावे नमुद आहेत. बाबालाल सनदे यांचे वारस महम्मद त्यांचा मुलगा बंडुलाल यांना घर मिळकत भाडेतत्वावर संपूर्ण गट नंबर मधील १९४९ ला देण्यात आली. नि. ३(१), ३(४),३(५) व ३(१)(९) सोबत १९४५–४६ रोजीचा ७/१२ उतारा बाबालाल सनदे संरक्षित कुळ असा उल्लेख आहे. १९५६–५७ च्या ७/१२ मध्ये रित ३ असा उल्लेख आहे. भुजंगदाव यांनी कधीही याबाबत हरकत घेतलेली नाही. बाबालाल चे वारस हे कधीही भाडेतत्वावरती दावा मिळकती मध्ये राहत नव्हते असे कोणत्याही कागदपत्राने सिध्द केलेले नाही. कबूलायत ने टेनन्सी हक्क भाडेतत्वावर दावा मिळकत दिली आहे. नि. ३(१९) सोबत ५ वर्षे खंडाने असे नमूद करून १९४६ ला घर मिळकतीचा ताबा दिला आहे. दावा मिळकतीचा कब्जा कधी परत दिला हे प्रतिवादीने अदयाप कोणतेही कागदपत्रादवारे कथन केलेले नाही व सिध्द केलेले नाही.

**२८.** नि. ३(२०) नुसार बंडूलाल १९४६ पासून कुळ आहे हे प्रतिवादी मान्य करत आहेत. नि. ३(२१) सोबत बाबालाल ने अर्ज सादर केला. नि. ३(२२) सन १९२९–३० पासून खंडाने असा फेरफार नमूद आहे. १०० वर्षापासून दावा मिळकतीचा ताबा वादीकडे आहे त्याप्रमाणे नि. ३(२४) ते ३(४३) खंडाच्या पावत्या दाखल केल्या आहेत. नि. ३(१०) सोबत संमतीपत्र दाखल केले आहे. खंडाने दावा मिळकत दिली होती हे मान्य केले आहे. खंड देत होते हे कोठेही अमान्य केलेले नाही. याबाबत शपथपत्र दाखल केलेले नाही. पावती कोणत्याही प्रकारे तयार करता येत नाही. वादीचे नाव ७/१२ ला नाही त्यामुळे दावा मिळकत तबदिल झाली तर ताबा इतर त्रयस्त व्यक्तीकडे प्रतिवादी तबदिल करतील. ताबा १०० वर्षापासून कुळ म्हणून आहे. १९६१ पासून ७/१२ ला नोंद नाही.

**२९.** नि. ३(५४) ते ३(८१), नि. ३(१२) ते ३(१५) उस रिपोर्ट सन २०१४, नि. ३(४७) विहीरी बाबत विज बील, नि. ३(५२)(५३) उस बील, १९६९–७२ नि. ३(४९) ते (५१) गूळ वडी तयार करण्याचे घाण्याचे मशिन, नि.

३(८२) फेरफार यामध्ये कूळ असे नमूद केले आहे. प्रतिवादी १ व २ स्वत: कष्टमशागत करतात याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. प्रतिवादी उसाचे उत्न्न घेतात याचाही कोणता पुरावा नाही. फक्त वादीचा पुरावा अमान्य करणे म्हणजे प्रतिवादीची कथने सिध्द होत नाहीत. सासरे हे कुळ होते असे प्रतिवादी कथन करत आहेत. पण त्याबाबत पुरावा कोणताही दाखल केलेला नाही. नि. २० ते २२ शपथपत्र दाखल केले आहे. कब्जेपट्टी आजअखेर दाखल केलेली नाही. प्रतिवादी सदयस्थितीत नि. १ मधील कथनांच्या ऐवजी इतर कथने करू शकत नाहीत.

**३०.** भाडेतत्वाने दिलेला करार केवळ नकार दिल्याने रद्द होत नाही. त्यास **इस्टोपल** या तत्वाची बाधा येते. कलम ४ नुसार कुळ कायदयानुसार प्रतिवादी उसाचे पिक दावा मिळकतीमध्ये घेत आहेत. विक्री करत आहेत याबद्दल प्रतिवादीने मान्य केलेले आहे.प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना का पक्षकार केले याचे कोणतेही कारण नमुद केलेले नाही. प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे बाबालाल चे वारस आहेत याबाबत कागदपत्र नाही. नि. ३(१०) सोबत दि. ०४/१२/२००६ रोजी स्टॅम्प लिहून दिला आहे. तो सटॅम्प का दिला याचे कारण नमूद नाही. दावा मिळकतीच्या कोणत्या गट नंबर मध्ये उसाचे पिक घेतले आहे याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. नि. ३(१)(३) दावा दाखल तारखेपासून दावा मिळकतीचा ताबा प्रतिवादी यांच्याकडे होता असे प्रतिवादीचे कथन आहे पण, नि. ३(४) ते (९) नुसार दाव्यास कारण घडले आहे.

**३१.** नि.३(११) ते (१६) कायदेशीर ताबा दाखविणेसाठी पुरेसे नाही. पहिल्यांदा भाडेकरू होते हे दाखविणे गरजेचे आहे. याबाबत महसूल नोंद का नाही याचे कारण नमूद नाही. कलम १४९ महाराष्ट्र जमीन महसूल कायदा आणि कलम ४ कूळ कायदा  याप्रमाणे कायदेशीररितया पिकाचे उत्पन्न घेत आहेत. १९६१ पूर्वीचे कागद फेरफार मुळे पुरावा म्हणून ग्राहय होत नाही. १९६१ पासून २०२२ पर्यंत कलम २४७ प्रमाणे अपील केलेले नाही. कलम ७४ कुळ कायदया प्रमाणे नवीन कुळ त्यांच्याकडे कधी ताबा देण्यात आला याकरिता कोणत्या अटी व शर्ती होत्या याचा उल्लेख नाही.

नि. २४(६) नुसार फेरफारला नावे कमी करण्यात आली आहेत.

**३२.** शामराव मयत झाल्यानंतर वादीने दावा मिळकत प्रतिवादी क. १ व २ यांचेकडे मालकी हक्काने कोणत्या पध्दतीने तबदिल झाली हे सिध्द केलेले नाही. दावा मिळकतीचे वाटप झालेले नाही. त्यामुळे, दावा मिळकतीतील १/२ हिस्सा प्रतिवादी क्र. १ व २ यांना कसा प्राप्त झाला याबाबत पुरावे म्हणून वादीला कुळ कायदयाने दावा मिळकत १९६१ नंतर कोणी दिली, १९६१ नंतर नवीन कुळ कायदयानुसार बदल झाला याबाबत कागदपत्रे नाहीत. ३२ ग चे कार्यवाही नुसार इतर सर्व घटना वादीने कथन केले नाही. नि. १४७, १४५ उस पिक घेतले होते पण याबाबतची कागदपत्रे नाहीत. नि. १ ला सहाय्य करणारे इतर कागदपत्रे दाखल नाहीत. नि. २२(११) ला बाबालाल ६ आणे फक्त असे ७/१२ वर कुळ म्हणून नमूद केले आहे. १९६१–६२ ला खुद्द असे नमूद करून बाबालाल ची नोंद चुकीच्या पध्दतीने कमी केली आहे.

**३३.** नि.२२(१७) प्रतिवादी क्र.३ ते २२ हे कुळ कायद्याने दावा मिळकतीमध्ये पिकाचे उत्पन्न घेत होते. त्यामुळे, कायदेशीर कुळ होते असे सिध्द करणे आवश्यक आहे. सकृतदर्शनी याबाबतचे पुरावे नाहीत. कलम १५७ व १४९ महाराष्ट्र जमीन महसूल यानुसार गृहीतक असल्याने याबाबत नोंद केल्याचे वर्दी अदयाप दिलेली नाही. ताबा दिल्याबाबत प्रतिवादीची कथने नाहीत. कलम ३१ प्रमाणे मालकाने कब्जे मागणी करणे गरजेचे होते. कब्जे पट्टी नाही त्यामुळे कब्जा कधीही वादीकडून प्रतिवादी ने घेतलेला नाही याबाबत नोटीस दिलेली नाही, म्हणजे कब्जेपट्टी झालीच नाही. अंशत: ताबा जरी सिध्द झाला तरी मनाई दिली पाहिजे.

**३४.** I am having possession over the suit property since 100 years. The defendants are owners my name was entered in other column of 7/12 extract. Possession was never handed over to defendant. My name is deleted from 7/12 extract in 1968 till today. My name is not entered in other column. They filed 32G, 32P on

record. Possession must be taken by owner. I did not surrender my possession unless and until execution of partition is completed. In 7/12 extract, name of defendants has been mutated in lower column. There is no presumptive value of title. What is the nature of crops. Crops live in property which crop is there it is not mentioned in pleading. My name is there or not is in material. You are not taken my possession from me. Possession must be there. I prove my possession.

**३५.** In written statement defendants denied invasive they have not specifically denied my possession. Description of suit property is not corrected. They did not filed correct description for compensation. There must be contrary description. How can court consider that, which description of properties boundaries are correct. Order 7 Rule 3 of CPC identification of property is necessary or sufficient to identify suit property.

**३६.** वादीने चतु:सिमा नमूद केल्या आहेत. नंबर क्षेत्र व आकार नमूद केले आहेत. प्रतिवादीने याउलट शपथपत्र दाखल केले नाही. दावा मिळकतीचे स्वरूप, नंबर कोठेही नमूद केलेले नाही. वादीने तहसीलदार यांच्यासमोर अर्ज दाखल केला . संरक्षित कुळ म्हणून वादीचे आजोबा व वडील यांचे नाव आहे. श्रीमंत राजाराम महाराजांच्या काळात वादीचे नाव कुळ म्हणून ७/१२ ला नोंद झाले. Defendant have to prove how it is incorrect.

**३७.** संपूर्ण कैफियतीमध्ये प्रतिवादी उस पिक घेत असल्याचे कथन केले आहे. उस पिकाचे काय केले, कोणत्या कारखान्याला दिला, गु-हाळ केला असल्यास त्याचे उत्पन्न किती झाले याचा कागदोपत्री पुराव दाखल केला नाही. If you say I am not there then you should prove your possession. यादव पिक उत्पन्न घेतात

असे कोठेही नमूद नाही. प्रतिवादी विधवा आहेत व निपाणी येथे राहणेस आहेत. त्यामुळे मे. न्यायालयात हजर राहत नाहीत. वादीने २५ वर्षाची कागदपत्रे गट नंबर नुसार दाखल केली आहेत. प्रतिवादी असे कथन करत नाहीत की, प्रतिवादी उस पिक घेतले आणि कारखान्याला उस पाठविले. When there is no specific deny regarding possession that is admission. Defendant has not filed partition suit. Therefore, my case is requested to be accepted as it is.

**३८.** हुकुमनामा झाला पण त्याची अंमलबजावणी बाबतचे अर्ज दाखल नाहीत. Possession was never handed over by me to the land lord till today. There is no documentary evidence to show that I have surrender possession to lander. परिच्छेद ४ मध्ये दाव्याच्या कामी नमूद केले आहे की, टेनन्सी कोर्टात चाललेल्या कामाच्या निकाला नंतर ही दावा जमीन पूर्वी प्रमाणेचे वादीचे पूर्वहक्कदार यांच्याकडे कूळ नात्याने जमीन मालकाने ठेवली आहे. I have possession from date of suit. कूळ नात्याने ७/१२ पत्रकी कुळ खंड, पूर्वहक्कदार बाबालाल सनदे यांच्या नावाने नमूद केले आहे. Whether my name is deleted is not relevant. Presumption of value is lower then the evidentially value of 7/12 extract prepared by Government. This is not title. Name of irrigation, crops shows in upper column of 7/12 extract. Name of person include that presume ownership. In this shows my possession.

**३९.** कुळ असल्याने उस लागवडीकरिता वादी घेत आहेत आणि साखर कारखान्यास उस पुरवठा करिता आहेत. पूर्वी वादीचे पूर्वहक्कदार गूळ आणि धान्याच्या स्वरूपात खंड प्रतिवादीचे पूर्वहक्कदार यांना देत होते. प्रतिवादीचे पूर्वहक्कदार खंड पावत्या देत होत्या. प्रतिवादी क्र. १ विजयसिंह यांची पत्नी आहे. विजयसिंह खंडाच्या पावत्या देत होते. सन २००६ साली स्टॅम्प वर लिहून दिले आणि दावा २०२३ मध्ये दाखल केला आहे. परिच्छेद ३ मध्ये वादी खर्चाचे कच्चे टिपण वहिमध्ये लिहीत असत

असे नमूद केले आहे याबाबतची वही दाखल केली आहे. त्यामध्ये पैसे पोचणे बाबत नोंद आहे. शामराव यादव काही वेळा विजयसिंह आणि प्रतिवादी क्र. १ चे भाउ बाळासाहेब निकम अशा प्रकारे टिपण वही मध्ये सहया करत होत्या. वादीचे मिळकतीमध्ये कूळ हक्काने कब्जे वहिवाट आहे. काही वेळा पावत्या घेतल्या नाहीत. कारण् पूर्वीपासून संबंध चांगले हाते. प्रतिवादी क्र. १ यांनी सांगितले की, प्रतिवादी यांचा दीर शामराव व प्रतिवादी यांच्यामध्ये वितुष्ट आहे. शामरावचा दावा मिळकती मधील हिस्सा मयत बाबालाल चे इतर वारस प्रतिवादी क्र. ३ ते ५ कूळ हक्काने करित आहेत. प्रतिवादी १ व २ हे दावा मिळकती मधील वादीच्या कायदेशीर हक्कास बाधा आणण्याच्या हेतूने शिरोली येथील काही लोकांच्या मदतीने दावा मिळकतीचा कब्जा सोडा असे बोलत आहेत. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी हरकत करत आहेत.

४०. दि. १५/०१/२०२२ रोजी वादीला बोलावून सांगितले की हक्क सोड आम्ही विक्री करणार आहे. त्यामुळे १८/०१/२०२२ रोजी दावा दाखल केला. १९४० पासून जमीन मिळकत वादी कडे आहे. हायवे ला लगत जमीन आहे त्यामुळे दावा मिळकतीची मागणी प्रतिवादी करित आहेत. नि.१६, १८ कैफियत मध्ये परिच्छेद ३ प्रतिवादी ३ ते ५ यांच्याशी संगनमत करून प्रस्तुतचा दावा केला आहे. केवळ नकार दिला. There is positive statement. There is no defense of defendant. They have denied my statement. There is no counter defense except denied of my plaint.

४१. दावा मिळकतीच्या चतु:सिमेचा नकाशा नाही. नि.१७(३) मध्ये नमूद केले आहे की, **Identification of Property.** प्रतिवादी ३ ते ५ यांनी शामरावची दावा मिळकत कसत आहे असे नमूद केले आहे त्यांना पक्षकार केले आहे. उर्वरित दावा मिळकत ही प्रतिवादी ३ ते ५ यांची आहे. प्लॉट मध्ये पूर्वेस शामराव यांच्या हिश्याची प्रतिवादी ३ यांच्या ताब्यातील जागा आहे. Why you are not filed affidavit of shamrao till today. संपूर्ण मिळकत ही वादीच्या ताब्यात आहे असे वादीने म्हटले

आहे. मी त्याबाबत चतू:सिमा नमूद केल्या आहेत. दाव्यामधील चतु:सिमा पोकळ असे म्हणता येणार नाही. प्रतिवादी ३ ते ५ यांची कैफियत मध्ये कथन आहे की, शामराव ची मिळकत त्यांच्या ताब्यात आहे.

**४२.** परिच्छेद २ ते ९ मधील मजकूर Ivasive denial आहे. भुजंगराव बद्दल दावा मिळकतीमध्ये परिच्छेद २ मध्ये नमूद आहे की, अ ब क ड उतारा १९४०–४५ रोजी ७/१२ ला नमूद आहे. १ हात ३ फूट तसू प्रत्यक्ष सी.पी सर्व्हे ला अतिक्रमण केल्याचे दिसून येते. आदेश ८ नियम ३ नुसार Denial to be specific. Defendant not denial specifically मी कुळ कब्जा घेतला नाही. ६३ वर्षापासून कब्जा आहे हे मी सांगत आहे. १९४८ ला बाबालाल ने जमीनीचा ताबा घेतला आहे. तेव्हापासून उस लागवड करित आहेत. प्रतिवादीने उस कारखान्याला पाठविला किंवा दावा मिळकत पडजमीन आहे हे प्रतिवादीने शाबित केले पाहिजे.

**४३.** वादी यांची कथने पुरावा सिध्द करण्यासाठी योग्य नाहीत. वादी यांनी चालू वर्षाच्या नियमानुसार रक्कम दिली असून कागदोपत्री पुरावा याबाबत दाखल नाही. परिच्छेद ६ मध्ये नमूद केले आहे की, वादी यांचे प्रतिवादी सोबत कुळ व मालक असे नात कधीही नव्हते. प्रतिवादी सरकार आहे. त्यामुळे वादी सांगतात जमीन सोडा. प्रतिवादी क्र. ३ ते ५ निम्म्या हिश्यामध्ये आहेत. प्रतिवादी ३ ते ५ यांच्या विरोधात मी कोणती मागणी केली नाही. त्यांना फॉर्मल पार्टी केले आहे. वादीने चतु:सिमेमध्ये ९७ आर पूर्वेस शामराव यादव यांच्या हिश्येची जमीन असे नमूद केले आहे. ताब्यात कुळ हक्काने ०.९७ आर ची मिळकत पूर्वेस राष्ट्रीय महामार्ग याबाबत शामराव यांनी स्वत: सांगितले पाहिजे वादी कूळ आहेत किंवा कसे. प्रतिवादी क्र. ५ पश्चिमेस काशिद यांच्या ताब्यात दिलेली हिस्सा जमीन, प्रतिवादी ३ ते ५ चतु:सिमेला आहेत म्हणून त्यांना ओवश्यक पक्षकार केलेले आहे. वादीचे मालक विजयसिंह होते. प्रतिवादी ३ ते ५ शामराव होते. पण, शामराव विजयसिंह यांचे इतर दावे सुरू आहेत.

**४४.** पान नं. ७ वर वादीने दाखल केलेली कागदपत्रे खोटी आहेत. They are

not producing single document regarding written statement. उसाचा करार, उस पुरवठा केले बाबत पावती वादीने दाखल केली आहेत. याबाबतचे शपथपत्र दाखल केल्याने वादी कडे ४८ वर्षापासून जमीन आहे असे नमूद केले आहे. वादीने दावा मिळकतीचा नंबर नमुद करून उस पावत्या हजर केल्या. प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादीने चुकीचे नंबर नमूद करून उस पावत्या हजर केल्या. तर प्रतिवादीने ख–या पावत्या हजर कराव्यात. सदरचे कागद कुळ कब्जे वहिवाटीचा पुरावा होउ शकतो. दावा दाखल करते वेळी ताबा वादीचा होता. दाव्यास कारण् १५/०१/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ ने वादीस बोलावून दावा मिळकतीचा व्यवहार करणार आहे. कब्जा सोडा, नाहीतर दांडगाव्याने कब्जा घेऊ असे बडया लोकांच्या साक्षीने म्हटले आहे. प्रतिवादी हे मालक आहेत हे वादी मान्य करत आहेत. वादीची सर्व कथने शपथपत्रावर दाखल केली आहेत. त्यामुळे, न्यायाचा तराजू वादीच्या बाजूने आहे. सबब वादीने मनाई आदेश मंजूर करणेबाबत विनंती केली.

**४५.** अभिलेखाचे अवलोकन केले. दावा मिळकत भुजंगराव यादव यांच्या मालकीची होती. भुजंगराव दि.१०.०६.१९७० रोजी मयत झाले. त्यांच्या मिळकती वारसाहक्काने १.विजयसिंह, २. शामराव यांना प्रत्येकी आठ आणे हिश्याने मिळाल्या. त्याप्रमाणे त्यांची नांवे सातबाराला नोंद झाली. प्रतिवादी क्र.१ व २ चे पूर्वहक्कदार भुजंगराव यांनी वादीचे पूर्व हक्कदार बाबालाल सनदे यांना कुळ म्हणून दावा मिळकत दिलेली होती. वादी हे बाबालाल सनदे यांचे नातेवाईक आहेत. वादीचे कथन आहे की, टेनन्सी कोर्टाच्या निकालानंतरही दावा मिळकत पूर्वीप्रमाणे वादीच्या पूर्वहक्कदार यांचेकडे कुळ या नात्याने जमीन मालकांनी दिलेली होती व त्यावेळेपासून दावा जमीन वादीकडे कुळहक्काने कब्जेवहीवाटीस आहे. वादीने कथन केले आहे की, वादी हे दावा मिळकतीचा खंड पूर्वी देत होते. प्रतिवादी क्र.१ ने तिच्या पश्चातीत वादीकडे पूर्वी प्रमाणेच कुळ या नात्याने खंडाने कसण्यासाठी दावा मिळकत दिली असून ठरल्याप्रमाणे वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना खंड देत आले आहेत. हिशेब झाल्यानंतर पूर्वी

प्रतिवादी क्र. १ व २ करीता शामराव यादव यांनी टिपण वहीमध्ये काही वेळा सहया करत आले आहेत व काही वेळा प्रतिवादी क्र.१ चे भाऊ बाळासाहेब निंबाळकर यांनी सदर टिपण वहीमध्ये सहया केल्या आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे शामराव हे चाणाक्ष होते. मुद्दा क्र.११ नुसार चालू वर्षी वादीने दावा मिळकतीमध्ये ऊस भात इत्यादी पिके केलेली असून दावा मिळकतीमधील ऊस राजाराम सहकारी साखर कारखाना येथे पुरवठा केला आहे व ठरल्याप्रमाणे वादीने ऊस बिलाच्या रक्कमेपैकी प्रतिवादी क्र.१ व २ यांना खंडाची रक्कम रोख दिलेली आहे. मुद्दा क्र.१२ नुसार प्रतिवादी क्र.१ व२ विरुध्द सदरचा मनाई दावा दाखल करुन तुर्तातुर्त मनाईची मागणी वादी करीत आहेत. प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी दावा मिळकतीमध्ये १/२ हिश्यामध्ये कुळहकक्ाने कब्जेवहीवाट असल्याने त्यांना पक्षकार केलेले आहे. याकामी वादीने भूमापन क्र.१४५ चा सन २०१७-२०१८ मधील सातबारा दाखल केला आहे, त्यामध्ये क्षेत्र १.१४.५० पैकी शामराव भुजंगराव यादव ०.२५.२५, नंदा विजय यादव आणि प्रियांका विजय यादव यांना ०.२५ ०.२५ सातबारामध्ये कुळ म्हणून कोणाचेही नाव नमुद नाही.

**४६.** वादीने पुराव्याकामी सर्वे नं.१४५ चा सन १९६६-६७ ते १९७५-७६ चा सातबारा दाखल केलेला आहे. यामध्ये कब्जेदार सदरी भुजंगराव यादव यांचे नांव कमी झाले आहे व १. वियज भुजंगराव यादव आठ आणे २.शामराव भुजंगराव यादव आठ आणे अशी नोंद आहे. गट नं.१४७ च्या सन २०१८-२०१९ च्या सातबारा मध्ये भोगवटदार वर्ग २ ची जमीन सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरास बंदी, सिलिंग कायदयांतर्गत वाटप जमीन (६४४१) असे नमुद आहे. क्षेत्र ०.९६ भोगवटादार म्हणून शामराव भुजंगराव यादव ०.४८.० आणि नंदा विजय यादव, प्रियांका यादव यांच्या नांवासमोर ०.४८.० अशी नोंद आहे. या सातबारावर कुळ म्हणून कोणाचेही नांव नाही. भूमापन गट क्र.१४९ क्षेत्र १.९४.० भोगवटदार वर्ग-२ शामराव भुजंगराव यादव ०.९७ नंदा विजय यादव, प्रियांका यादव यांच्या नांवासमोर ०.९७ सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरास बंदी, सिलिंग कायदयांतर्गत्

वाटप जमीन (४१) असे नमुद आहे. या सातबारावर कुळ म्हणून कोणाचेही नांव नाही. सर्वे नं.१४७ क्षेत्र २ एकर १५ गुंठे सन १९५६–५७ ते १९६५–६६ या सातबारा मध्ये कब्जेदार म्हणून सरकार आणि भुजंगराव यादव व इतर हक्कांमध्ये सा.कुळ बाबालाल लालासो सनदी, मोहद्दीन इमाम देसाई, माणिक हुसेन देसाई, बाळासो धोंडी देसाई, खुतुब गोलंदाज या कुळांची नांवे कमी केलेली आहे (५४९१). सन १९९१–६२ ते १९६५–६६ पर्यंत पिक पाणीस खुद्द अशी नोंद आहे. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी दाखल केलेल्या पुराव्यानुसार फेरफार नं.५४९१ दि.१७.०३.१९६१ रे.क.नं. १५९/१९५७ च्या हुकुमाप्रमाणे सदरील जमीनीचा कब्जा कुळ १ बाबालाल लालासो सनदी, मोहद्दीन इमाम देसाई, माणिक हुसेन देसाई, बाळासो धोंडी देसाई, खुतुब गोलंदाज, कादर देसाई यांचे कब्जातून जमीन मालक भुजंगराव पर्वतराव यादव यांना दि.१६.०३.१९६१ रोजी पंचादी याने देऊन तालुक्यास मु.रजिस्टर नं.८९/१९६०–६१ च्या रिपोर्ट तालुक्यास देणे असलेने कुळाचा कुळहक्क कमी त्याखाली सही इंग्रजी मध्ये तलाठी यांची सही आहे. अतिरिक्त तहसिलदार यांचा १९.०१.१९७५ चा निर्णय आणि अपर तहसिलदार यांचे १९.०१.१९७५ च्या पत्राने निर्णय ज.मालकाने मे. कोर्टामार्फत कब्जा घेतला असल्याने भू गट क्र.३२ग ची चौकशी रद्द केली आहे, अशा नोंदी आहेत. मामलेदार यांचे पत्रानुसार भजुंगराव यादव कोल्हापूर अर्जदार विरुध्द बाबालाल लालासो सनदी, मोहद्दीन इमाम देसाई, माणिक हुसेन देसाई, बाळासो धोंडी देसाई, खुतुब गोलंदाज, कादर देसाई याचा निर्णय दि.२१.१२.१९५७ रोजी होऊन सर्व जमीनीचा कब्जा अर्जदार यांना देण्याचा हुकुम झाल्याने हुकुम देण्यात येतो की– जमीनचा कब्जा दयावा व सातबारा योग्य दुरुस्ती करुन कब्जेपट्टीसह इकडे रिपोर्ट करावा दि.१६.०२.१९६० त्यामध्ये स.नं.१४३ क्षेत्र ५ आकार १२, स.नं.१४५ क्षेत्र ३८२ आकार १७, स.नं.१४७ क्षेत्र २८१५ आकार १४, स.नं.१४९ क्षेत्र ४८३२ आकार २९ अशा नोंदी नमुद आहेत.

**४७.** उपरोक्त बाजूंचा विचार करता भुजंगराव यादव यांनी बाबालाल सनदे

यांना खंडाने जमीन दिली होती तो करार दि.१६.१२.१९४६ रोजी झाला होता. त्यामध्ये सन १९६० नंतर जमीनी परत मालकाच्या कब्जात देण्याची अट आहे. फेरफार नं.४८५४ दि.२८.०६.१९५७ नुसार सदर जमीनीचे कुळ बाळ धोंडी देसाई यांनी १/८ हिश्यास कुळपणाची वहीवाट सन १९५६–५७ या सालात केली नसल्याने हक्क कमी, फेरफार नं.६४४१ वारसाने तारीख २१.०८.१९७० खातेदार भुजंगराव पर्वतराव यादव दि.१०.६.१९७० रोजी मयत झाले त्यांना १. श्रीमती सुशिलाबाई भ्र भुजंगराव यादव वय ५० वारस मुले १ विजय वय २९, २ शामराव वय २७ वारस मुलगी सौ शैलजा वय २३, रणजितसिंह याप्रमाणे वारस आहेत. दि.२१.०८.१९७० च्या अर्जाप्रमाणे व स्थानिक चौकशीनुसार विजय, शामराव याप्रमाणे नांवे दाखल केलेली आहेत. '८ नोंद मंजूर दि.३०.०९.१९७०'.

**४८.** श्री शामराव भुजंगराव यादव यांनी रे.क.नं.१०.१०.२००४ मे. दिवाणी न्यायाधीश व.स्तर कोल्हापूर यांचेकडे दावा दाखल केला असून श्रीमती नंदीनी विजय सिंह यादव (नंदा विजय यादव) यांना नंबर १ चे प्रतिवादी केलेले आहे. त्यामध्ये मुद्दा क्र.१० मध्ये कायम मनाई ताकीद मिळावी अशी मागणी केलेली आहे. सरस निरस मानाने वाटप होणकरीता त्यांनी विनंती केलेली आहे. मे. न्यायालयाने the application is partly granted. Both parties to the suit are directed to maintain status quo about the sugarcane amount until further order असा आदेश दिला आहे. नंदा विजयसिंह यादव यांनी दिलेल्या संमतीपत्रामध्ये संमती दिल्याची दि.१०.११.२००६ आहे व त्या समंतीपत्रासाठी वापरलेला स्टॅम्प दि.४.१२.२००६ रोजी खरेदी केलेला आहे. या संमतीपत्रामध्ये कालावधी नमुद नाही. संमतीपत्र देणाऱ्याने स्टॅम्प खरेदी केला नाही पण या संमतीपत्रासाठी स्टॅम्प खरेदी लिहून घेणाऱ्याने केला आहे असे दिसून येते. याबाबत योग्य ती माहिती अभिलेखावर असणे गरजेचे आहे. संमतीपत्र केल्यानंतरही वादीने प्रतिवादीला खंड दिल्याचा पुरावा अभिलेखावर दाखल नाही किंवा प्रतिवादीच्या अधिकारपत्राने खंड दिल्याचा पुरावा

दाखल नाही. संमती दिल्याची तारीख व स्टॅम्प खरेदीची तारीख पाहता याबाबतचा पुरावा वादीने दाखल करणे आवश्यक आहे. वादीने दाखल केलेल्या टिपण वहीमध्ये सहया दिसून येत नाहीत. बंडूलाल महंमद सनदे यांनी सन २०१५–१६ पासून २०२१–२२ पर्यंतच्या स.नं.१४९ मध्ये ऊस पाठविल्याच्या वजन पावत्या हजर केलेल्या आहेत. त्या उत्पन्नातून आलेली रक्कम खंड म्हणून जमीन मालकाचा देण्याचा कोणताही पुरावा वादीने दिलेला नाही. वादीने कथन केल्याप्रमाणे खंडाची रक्कम प्रतिवादीच्या कोणत्या बँकेत अगर कोणत्या पध्दतीने जमा केली आहे याबाबतचा अधीकचा पुरावा देणे आवश्यक आहे. दावा मिळकतीच्या सातबारावर सन १९६१ पासून कोणाचेही नांव कुळ म्हणून नाही आणि कुळ म्हणून नांव सातबारावर नोंद करण्याकरीवा वादीने किंवा पूर्वहक्कदार यांनी कोणकोणते प्रयत्न केले आहेत याबाबतचे कागदपत्र दाखल करणे आवश्यक आहे. सन १९६१ नंतर जमीन मालकांनी कोणालाही जमीन कसण्याचा अधिकार दिलेला नव्हता. वादीने दावा मिळकतीतील उत्पन्नांचा हिस्सा जमीन मालकांना दिल्याचे पुरावे दाखल नाहीत. अशा परिस्थितीत वादीला कुळ म्ळणून सातबारावर नोंद करण्यासाठी वादीने अधीक पुरावा सादर करणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांना वादीने टेनन्सी कायदयाप्रमाणे कब्जे पट्टी दिलेली नाही असे वादीचे कथन असल्यास त्याबाबत प्रतिवादी यांनी योग्य तो तोंडी आणि कागदोपत्री पुरावा दाखल करणे आवश्यक आहे. सबब, वादीस सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्याच्या अभावी केस असल्याचे दिसून येत नाही. सबब **मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे**.

<u>**मुद्दा क्र.२ करीता**</u>:–

**४९.** श्रीमती नंदिनी विजयसिंह यादव, प्रियांका विजयसिंह यादव यांनी दि.क.नं.८९/२००६ मे सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन कोल्हापूर येथे दाखल केला असून त्यामध्ये शामराव भुजंगराव यादव इत्यादी २२ प्रतिवादी केलेले आहेत. हा दावा वाटपाचा व स्वतंत्र कब्जाकरीता आहे. या दाव्यात मौजे शिरोली पुलाची येथील गट

नं.१४५, १४७, १४९ या मिळकतींचा समावेश आहे. या दाव्यात त्यांनी अर्ज कलम १अ ते १जी मध्ये नमुद मिळकतीमधील वादीचा ४/५ हिस्सा तुटक करुन स्वतंत्ररित्या वादीच्या ताब्यात देणेबाबत हुकुम व्हावा अशी विनंती केलेली आहे. विजयसिंह यादव हे दि.०५.०४.२००४ रोजी मयत झाले आहेत. बंडूलाल महंमद सनदे यांनी दि.०४.१२.२००६रोजी २० रुपयाचा स्टॅम्प खरेदी केला व त्यावर संमतीप्रत लिहीले आहे. लिहून देणार श्रीमती नंदा विजयसिंह यादव लिहून घेणार बंडूलाल सनदे शिरोली असे नमुद केलेले आहे. मौजे शिरोली, ता. हातकणंगले येथील माझे पती विजयसिंह यादव यांच्या मालकी वहीवाटीची रिव्ही स.नं.१४५, १४७, १४९ मधील आठ हिश्याची जमीन खंडाने पूर्वीपासून बंडूलाल महंमद सनदे रा. शिरोली हे देखभाल करीत असून सदर जमीनीतील पिके तयार करुन आमच्या वतीने साखर कारखाना व गुऱ्हाळ करत असतात व ऊस, गहू, सोयाबीन, शेंगा ही पिके पिकवून आम्हांला रितसर खंड देतात, तरी यापूढील पिके लावण करण्यास आम्ही त्यास सर्वप्रकारची संमती लिहून दिली आहे. सदर संमती दि.१०.११.२००६, पत्र माझे पती मयत वारस या नात्याने लिहून दिलेले आहे. आपली विश्वासू सही अशा स्वरुपाचा मजकूर नमुद आहे.

**५०.** उपरोक्त बाबी नुसार वादी क्र.२ हारुण मकबुल सनदे यांचे नांव पूर्वीच्या कुळामध्ये नव्हते. त्यांच्या वारसाबाबत कोणताही उल्लेख नव्हता. त्यामुळे त्यांचा वादी म्हणून पक्षकार का केले आहे याबाबत अस्पष्टता आहे. फेरफार नं.४८५४ कुळाने वहीवाट न केलेस कुळाचा वहीवाट हक्क नष्ट होता. फेरफार नं.५४९१ ने सर्व कुळांचे हक्क कमी केलेले आहे. कुळाचे हक्क दि.२५.०३.१९६१ ला कमी केल्यानंतर वादी अगर इतर कुळ यांनी सन २०२१ अखेर वरिष्ठ न्यायालय अगर टेनन्सी कोर्ट यांचेकडे दाद मागितलेबाबत अभिलेख दाखल करणे आवश्यक आहे. असे अभिलेख दाखल न केलेस वरिष्ठांकडे दाद मागितली नाही असे स्पष्ट होते. सन १९६१ नंतर वादीने दावा मिळकत मालक यांना खंड दिलेचा पुरावा दाखल केला नाही. प्रतिवादी यांनी संमतीपत्र

दिल्यानंतर त्यांना खंड मिळाल्याबाबतचा पुरावा प्रतिवादी यांनी देखील दाखल केल्याचे स्पष्ट होत नाही. सन २००६ नंतर वादीने प्रतिवादी नंदा यादव यांना कोणता व कशापध्दतीने खंड दिला याचा अधीक खुलासा करणे आवश्यक आहे. सबब सदयस्थितीत जरी टेनन्सी कायद्यानुसार वादीने दावा मिळकतीची कब्जा पट्टी प्रतिवादीला दिली नाही तरी देखील मूळ मालक या नात्याने प्रतिवादी यांचा दावा मिळकतीवर हक्क आहे. वादीने उत्पन्नाचा खंड जमीन मालकाला कोणत्या स्वरुपात दिला आहे हे सिध्द केल्याशिवाय वादी तुर्तातुर्त मनाई आदेश मिळणेस पात्र नाही. सबब वादी यांनी दाखल केलेली टिपण वही आणि वादीने प्रतिवादी अगर त्यांचे वारसांना आज अखेर खंड दिल्याबद्दलचा अधीकचा पुरावा दाखल केल्याशिवाय न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे असे सिध्द होत नाही. **सबब मी मुद्दा क्र.२ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे**.

<u>मुद्दा क्र.३ करीता</u>:–

**५१.** वादीच्या मते प्रतिवादी हे सरकार घराण्यातील आसामी होती. सद्यस्थितीत त्यांना इतर मोठया इसमांना दावा मिळकत विक्री करण्याचे असल्याने आणि सदरची जमीन मुख्य हायवे लगत असल्याने सदरच्या जमीनीच्या बाजारभावाप्रमाणे किंमती जास्त होत असल्याने अधीक फायदा होण्याच्या अपेक्षेने वादीस दावा मिळकतीतून बेदखल करण्याचा प्रतिवादी प्रयत्न करीत आहेत. वादीने टेनन्सी कायदयानुसार कब्जे पट्टी दिलेली नाही हे जरी मान्य केले तरी उपरोक्त मुद्दा क्र. १ व २ मधील विवेचनानुसार वादीने खंडाची रक्कम कोणास आणि कोणत्या स्वरुपात दिली हे शाबीत करण्यासाठी अधीकचा पुरावा दिल्या शिवाय आणि वादीची नोंद सातबाराला कुळ म्हणून नोंद केल्याशिवाय सदर कामी वादी तुर्तातुर्त मनाई मिळणेस पात्र नाही. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास वादी यांचे अपरिमित नुकसान होईल असे दिसून येत नाही. तथापि प्रतिवादी यांनी योग्य कायदेशीर तरतुदीनुसार दावा मिळकतीमधील वादीच्या कब्जेवहीवाट संदर्भातील कब्जेपट्टीबाबत योग्य पुरावा दाखल

करण्याचे निर्देश देणे क्रमप्राप्त आहे. सबब **मी मुद्दा क्र.३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. ४ चे उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो–**

**–:: <u>आ दे श</u> ::–**

१. वादी यांचा निशाणी क्रमांक ५ वरील तुर्तातुर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो.

SMITA JAGANNATH PENDE

Digitally signed by SMITA JAGANNATH PENDE
Date: 2026.04.23 18:23:41 +0530

**पेठ–वडगांव.** **( एस. जे. पेंडे )**

**दि. २३/०४/२०२६** **२ रे सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**पेठ–वडगांव.**